**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**दिनांक १ जानेवारी २०२५**

**बुधवार ठळक बातम्या**

**1. प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानाधारित पीकविमा योजनेला मुदतवाढ केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी**

**2. नववर्षाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली दौऱ्यात अनेक विकास कामाचे केले लोकार्पण**

**3. राज्यात भरड धान्य खरेदी अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणीची मुदत येत्या १५ जानेवारी पर्यंत वाढ**

**4. विदर्भ साहित्य संघाचे राज्यस्तरीय व वाङ्मय पुरस्कार जाहीर येत्या १४ जानेवारी रोजी विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापनदिनी होणार वितरण**

केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने आज प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि पुनर्रचित हवामान आधारित पीक विमा योजना 2025-26 पर्यंत सुरु ठेवायला मंजुरी दिली. योजनेच्या 2021-22 ते 2025-26 या काळासाठी एकूण रु.69,515 कोटी खर्चालाही केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या निर्णयामुळे 2025-26 पर्यंत देशभरातील शेतकऱ्यांना आकस्मिक नैसर्गिक आपत्तींमुळे उद्‌भवणाऱ्या जोखमीपासून पिकाचे संरक्षण करायला मदत होईल. शेतकऱ्यांना परवडणाऱ्या किमतीत डीएपी खताची शाश्वत उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी 01.01.2025 पासून ‘एनबीएस’ अनुदानाव्यतिरिक्त डाय-अमोनियम फॉस्फेट (डीएपी) साठी पुढील आदेश येईपर्यंत विशेष पॅकेज देण्याच्या निर्णयाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. डीएपी म्हणजेच डाय-अमोनियम फॉस्फेट या खताचे एका वेळचे विशेष पॅकेज देण्याचा निर्णय घेण्यात आला.

## नववर्ष स्वागत

देशासह जगभरात नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत केलं जात असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. भारताच्या दैदिप्यमान, सर्वसमावेशक आणि शाश्वत भविष्यासाठी एकजुटीनं कार्य करण्याच्या वचनबद्धतेला आपण पुन्हा एकदा उजाळा देऊ या, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. संविधानकर्त्यांच्या स्वप्नांना साकार करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी कार्य करण्याची हीच वेळ असल्याची आठवण उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात करुन दिली आहे. तर नवीन वर्षात सर्व देशवासीयांना उत्तम आरोग्य, समृद्धी, नवनवीन संधी, यश आणि आनंद मिळो, अशी शुभकामना प्रधानमंत्र्यांनी केली आहे.सामाजिक विषमता दूर करून समतावादी समाज निर्माण करण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहूया असं राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या जनतेला नववर्षाच्या शुभेच्छा देताना ‘महाराष्ट्र आता थांबणार नाही’ असा संकल्प केला आहे.

## गडचिरोली

आज नववर्षाच्या सुरुवातीला गडचिरोली येथे अनेक विकास कामांचे भूमिपूजन तथा लोकार्पण करण्यात आले आपल्या एक दिवसीय दौऱ्यात देवेंद्र फडणवीस यांनी आधी  गर्देवाडा ते अहेरी बस सेवेचा शुभारंभ केला सुमारे 77 वर्षानंतर येथे बस सेवा चालू झाले असल्याचा त्यांनी सांगितलं.  यानंतर त्यांनी पेनगुंडा या चेक पोस्टच उद्घाटन केले .याच पोस्टमुळे छत्तीसगड राज्याशी गडचिरोलीचा संपर्क स्थापित होणार आहे यानंतर लॉईड मेटल कंपनीच्या विविध विभागांचे उद्घाटन त्यांनी केले याप्रसंगी त्यांनी बोलताना सांगितलं की या प्रकल्पामुळे रोजगार निर्मिती होऊन या भागात परिवर्तन होईल.

*ज्या भागांमध्ये माओवाद्यांचा मोठ्या प्रमाणात डॉमिनन्स होता आता तिथे आपला डॉमिनन्स तयार झालेला आहे आणि सगळ्या प्रकारे लोकांनी माओवाद्यांना नाकारल आहे. १२ गावांनी ठराव*

*करून  माओवाद्यांना राशन पानी नाकारल त्यांनी जे आय.ई डी . लावल होत ते पोलिसांकडे जमा केले आहे त्यामुळे एक नवीन पहाट ही ह्या ठिकाणी गडचिरोली जिल्ह्यामध्ये तयार झालेली आहे जे मी सारख सांगायचो ,की ह्याला महराष्ट्राचा शेवटचा जिल्हा म्हणू नका हे महाराष्ट्रच प्रवेश द्वार आहे हा पहिला जिल्हा आहे तस ट्रांस्फरमेशन आम्ही सुरू केल आहे आणि मला विशेष आनंद आहे कोणसरीचा हा प्रकल्प ज्याच भूमिपूजन मी मुख्यमंत्री असताना मी केल होत आता त्याचा  पहिल्या फेजच उद्घाटन याठिकाणी करतो आहे अनेक प्रकल्पानचा  आज उद्घाटन  भूमिपूजन होत आहे दहा हजार लोकाना रोजगार मिळाला आहे  . पाच हजारांना दहा  महिन्यानंतर काम पूर्ण झाल्यानंतर रोजगार त्याठिकाणी मिळणार आहे.*

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लाॅईड्स मेटलच्या लाईड्स राज विद्यानिकेतन सीबीएससी शाळा, लाॅईड्स काली अम्माल मेमोरियल हॉस्पिटल, लाईड्स नव्या क्लोदिंग कंपनी, फॅमिली काॅर्टर्स, कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र, पोलीस ऑफीसर फॅमिली काॅर्टर्स, जिमखाना व बालोद्यान या विविध उपक्रमांचे उद्घाटन रिमोट च्या सहाय्याने करण्यात आले. त्यानंतर फडणवीस यांनी गडचिरोली पोलीस दलातील सी 60  जवानांचा सुद्धा सत्कार केला.

<u>शौर्य दिन</u>

पुण्याजवळ कोरेगाव भीमा या ठिकाणी आज दोनशे सातव्या शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभाचं दर्शन घ्यायला हजारोजण जमले आहेत. शहर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभास अभिवादन केले. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही आज भीमा कोरेगाव इथल्या विजयस्तंभाला अभिवादन केलं. विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी हजारो लोकांची उपस्थिती, हा संघर्ष जिवंत असल्याचे निदर्शक आहे, असं ते या वेळी म्हणाले.

## एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) धोरण

आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राने दिशादर्शक व्हावे यासाठी राज्याचे पहिले एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) धोरण तयार करा, असे निर्देश, माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार यांनी आज विभागाला दिले.सह्याद्री अतिथीगृहावर आज माहिती व तंत्रज्ञान विभागाचा मंत्री ॲड आशिष शेलार यांनी आढावा घेतला.

## वन नेशन वन सबस्क्रिप्शन योजना

विद्यार्थ्यांना विद्वत्तायुक्त संशोधन लेख आणि पत्रिका प्रकाशनांमधलं ज्ञान सहज उपलब्ध व्हावं या उद्देशानं आखण्यात आलेल्या 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' योजनेला आजपासून प्रारंभ झाला. यामुळे सरकारी अनुदान असलेल्या शैक्षणिक संस्था, विद्यापीठं आणि भारतीय तंत्रज्ञान संस्थेतल्या देशभरातल्या सुमारे १ कोटी ८० लाख विद्यार्थ्यांना जगभरातल्या उच्च दर्जाच्या नियतकालिकांमध्ये उपलब्ध असलेल्या ज्ञानाचं भांडार खुलं होईल.

## भरड धान्य खरेदी

राज्यात भरड धान्य खरेदी अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणीची मुदत येत्या १५ जानेवारी पर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे सर्व धान उत्पादक शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नजीकच्या केंद्रामधून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी असं आवाहन अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षणमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे.

चंद्रशेखर बावनकुळे

केंद्र सरकार व राज्य शासनाच्या लोक कल्याणकारी योजना प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहचाव्यात यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. सर्वसामान्यांना अधिकाधिक योजनांचा लाभ व्हावा यादृष्टीने मुख्यमंत्री तीर्थ दर्शन यात्रा ही अनेक गोरगरिबांना आपल्या इच्छांची पूर्ती करणारी यात्रा म्हणून महत्वाची आहे. यादृष्टीने विचार करुन कोराडी महालक्ष्मी जगदंबा संस्थेच्यावतीने महालक्ष्मी ते अयोध्या तिर्थयात्रेचा आज प्रारंभ करण्यात आला. पहिल्याच यात्रेत आमच्या कष्टकरी लाडक्या बहिणींना अयोध्या येथील तीर्थदर्शनाचा लाभ होत असल्याचा मनस्वी आनंद आहे असे प्रतिपादन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले

वाचन संकल्प महाराष्टचा

उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे वाचन संकल्प महाराष्टचा उपक्रम  आज पासून राज्यभर १ ते १५ जानेवारी या कालावधी पर्यंत राबविण्यात येत आहे या पंढरवाड्या दरम्यान सिव्हील लाइन परिसरातील शासकीय विभागीय ग्रंथालयात ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहेउच्च व तंत्र शिक्षण भागाने २० डिसेंबर २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करून या विभागाच्या आधिपत्या खालील राज्यातील विद्यापीठे ,महविद्यालये ,सार्वजनिक ग्रंथालयेमध्ये "वाचन संकल्प महाराष्टचा " हा अभिनव उपक्रम राबविण्याचे जाहीर केले आहे .

विदर्भ साहित्य संघ पुरस्कार

विदर्भ साहित्य संघाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या वाड्मय पुरस्कारांची काल  घोषणा करण्यात आली आहे. येत्या, १४ जानेवारी  रोजी विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिन समारंभात सन्माननीय पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार प्राप्त साहित्यिकांना हे वाड्मय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.विदर्भ साहित्य संघाकडे जून ते जुलै २०२३- २४ या काळात प्रकाशित झालेल्या साहित्यकृतींमधून विदर्भातील प्रसिद्ध लेखकांसह नवोदित लेखकांच्या पुस्तकांना पुरस्कृत करण्यात येत आहे. तसेच पाच राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येत आहेत.राज्यस्तरीय विदर्भ साहित्य संघ अनुवाद पुरस्कार, दीपक घारे यांच्या ‘सैय्यद हैदर रक्षा ( एका प्रतिभावंत चित्रकाराचा

प्रवास)` या पुस्तकाला प्राप्त झाला आहे. राज्यस्तरीय आशा सावदेकर स्मृती साहित्य समीक्षा पुरस्कार, श्रीनिवास हेमाडे यांच्या ‘तत्वभान` या ग्रंथाला बहाल करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय कविवर्य श्रीधर शनवारे स्मृती पुरस्कार ‘घेतलय स्टेअरींग हाती` या डॉ.पद्‌मरेखा धनकर यांच्या कविता सग्रंहाला प्राप्त झाला, डॉ. मा.गो. देशमुख स्मृती ‘राज्यस्तरीय` संतसाहित्य/साहित्यशास्त्र लेखन पुरस्कार डॉ. अलका चिडगोपकर यांच्या ‘मध्ययुगीन मराठी संत कवयित्रींची काव्यधारा’ ग्रंथास प्राप्त झाला आहे.

*****